पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८ नगरसचिव कार्यालय,
क्रमांक - नस/३/कावि/७२१/२०१८
दिनांक - २५/०५/२०१८

प्रति,

मा.........................................,
सदस्य, स्थायी समिती,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८.

विषय - पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची साप्ताहिक सभा दिनांक - ३०/०५/२०१८ रोजी आयोजित केले बाबत....

महोदय/महोदया,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची साप्ताहिक सभा बुधवार, दिनांक **३०/०५/२०१८** रोजी दुपारी **०२.००** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सोबत सभेची कार्यपत्रिका जोडली आहे. सभेस आपण उपस्थित रहावे, ही विनंती.

आपला विश्वासू,



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत - १) सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
२) कार्यालयीन नोटीस बोर्ड

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११ ०१८.

मा.स्थायी समिती

**कार्यपत्रिका क्रमांक – ६५**

**दिनांक - ३०/०५/२०१८** **वेळ – दुपारी ०२.०० वाजता**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची साप्ताहिक सभा बुधवार, दिनांक **३०/०५/२०१८** रोजी दुपारी **०२.००** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सभेत खालील कामकाज होईल.

----------

दिनांक २३/०५/२०१८ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक ६४) चा सभावृत्तांत कायम करणे.

----------

विषय क्र.१) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये NIC यांचेकडील ई-निविदा (e-Procurement) संगणक प्रणालीचे यशस्वीपणे अंमलबजावणी होण्याच्या दृष्टीने NIC, NICSI यांचेकडील एकूण ३ Support Staff सहा महिन्यांकरीता नियुक्त करणेकरीता येणारा खर्च र.रु.६,१०,८२६/- (अक्षरी र.रु.सहा लाख दहा हजार आठशे सव्वीस फक्त) अथवा प्रत्यक्ष येणारा खर्च NIC, NICSI यांना आगाऊ अदा करणेस तसेच सदरचा Support Staff हा NIC, NICSI यांचेमार्फत करारनामा न करता थेट पध्दतीने उपलब्ध करुन घेणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

(दिनांक ३०/०५/२०१८ चे सभेत घेणेचे निर्णयाप्रमाणे)

विषय क्र.२) पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील रस्त्यांमधून भुमिगत सेवावाहिन्या टाकण्यासाठी मनपाकडे विविध शासकीय/निमशासकीय तसेच खाजगी संस्थेंकडून रस्ता खोदाई परवानगीसाठी प्रकरणे वेळोवेळी सादर होत असतात. सदर सेवावाहित्या नगरिकांच्या सोयीसाठी आवश्यक असल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम २३९ अन्वये सदर संस्थांना त्यांचेकडील भुमिगत सेवावाहिन्या टाकण्यासाठी रस्ता खोदाई परवानगी महापालिकेमार्फत देण्यात येते. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम २४१(२) अन्वये संबंधित कंपनीकडून सदर खोदलेला रस्ता दुरुस्त करण्यासाठी जो खर्च येईल तो वसूल करावयाचा आहे. त्यासाठी सदर खोदलेले रस्ते दुरुस्तीसाठी मनपाने दर निश्चित

केले असून सदर दर वेळोवेळी सुधारित करण्यात येतात. मनपाच्या सदर प्रचलित दरानुसार रस्ता दुरुस्तीपोटी येणारा खर्च संबंधित कंपनीकडून आगाऊ भरुन घेण्यात येतो. सद्य:स्थितीत सदर रस्ते दुरुस्ती शुल्कामध्ये रस्ता दुरुस्ती खर्च अंदाजे सरासरी र.रु.६,५००/- व मनपा अधिभार सरासरी र.रु.३,०००/- असे प्रती मी. प्रमाणे आकारण्यात येतो. त्यानुसार अद्याप पर्यंत सर्व खाजगी, शासकीय/ निमशासकीय संस्थांना (महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनी मर्यादित वगळून) त्यांच्या सेवावाहिन्या टाकण्यासाठी वरीलप्रमाणे शुल्क आकारुन रस्ता खोदण्यासाठी परवानगी देण्यात येत आहे. खोदलेल्या रस्त्यामुळे वाहतुकीस होणारा अडथळा व त्यामुळे होणारे अपघात टाळण्याच्या दृटीकोनातून तसेच नागरिकांच्या सुरक्षित वाहतुकीसाठी मनपास रितसर निविदा प्रक्रिया करुन, सदर खोदलेल्या रस्त्यांची दुरुस्ती तातडीने करावी लागते.

**<u>महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांची मागणी-</u>**

कार्यकारी अभियंता, मऔविम यांचे कडील पत्र क्र.उ.अ./स्था/IFMSA0664/2018 दि.४/१/२०१८ पत्राचे अवलोकन होणेस विनंती. सदर पत्रामध्ये कार्यकारी अभियंता, मऔविम यांनी पिं.चिं. औद्योगिक क्षेत्रातील जुन्या जलवाहिन्या बदलण्या संदर्भात परवानगी विषयी दि.२०/१२/२०१७ च्या पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेमध्ये निर्णय घेणेकामी विनंती केली होती. तरी अद्यापपावेतो पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतर्फे या सर्व साधारण सभेमध्ये काय निर्णय झाला ते अद्याप कळविण्यात आलेले नाही. तरी आपण आपल्या स्तरावर योग्य तो निर्णय घेऊन परवानगी संदर्भात कार्यवाही त्वरीत करावी, जेणे करुन सदरील काम लवकरात लवकर सुरु करता येईल व उद्योजकांतर्फे येणा-या पाण्याच्या तक्रारी दूर करता येतील, असे कळविलेले आहे.

त्यानुषंगाने, इकडील पत्र क्र.स्था/श.अ./तां/४/३२/२०१८ दि.३१/१/२०१८ अन्वये कार्यकारी अभियंता, मऔविम यांना अद्यापपावेतो महानगरपालिकेच्या मा.महापालिका सभेमध्ये पिंपरी चिंचवड औद्योगिक क्षेत्रातील जुन्या जलवाहिन्या बदलण्या संदर्भात परवानगीबाबत निर्णय घेण्याबाबतची कार्यवाही करण्यात आलेली नाही. सबब सद्य:स्थितीत मनपाच्या प्रचलित पध्दतीप्रमाणे खोदाईची परवानगी घेऊन कार्यवाही करण्यात येणे बाबत कळविलेले आहे.

उप अभियंता, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांचेकडील पत्र क्र.उ.अ./ IFMNS/A56045/2018 दि.१२/२/२०१८ चे अवलोकन होणेस विनंती. सदर पत्रान्वये उप अभियंता, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांनी "मऔविम क्षेत्रामधील व पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील काही जुन्या जलवाहिन्या बदलण्याचे काम चालू करण्यासाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिकाकडे रस्ते खोद काम करणेसाठी परवानगी मागितलेली आहे. सदर रस्ते मऔवि महामंडळाचे मालकीचे असून रस्ते दुरुस्ती व देखभखालीसाठी पिंपरी चिंचवड नवनगरपालिकेस हस्तांतरीत करणेत आलेले आहेत. तरी मऔविम क्षेत्रामधील जुन्या जलवाहिन्या बदलण्यासाठी रस्ते खोदकाम शुल्क परिगणित करताना मनपा अधिभार लावू नये", असे कळविलेले आहे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील रस्त्यात बाह्य संस्थेंच्या भूमिगत सेवावाहिन्या टाकणेसाठी रस्ता खोदाईस परवानगी देणेसाठी रस्ता पुर्ववत करणेच्या शुल्क व मनपा अधिभार आकारण्या बाबतचे धोरण दि.९/५/२००७ च्या मान्य प्रस्तान्वये निश्चित केलेले आहे. सदरचे धोरण निश्चित करताना "पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीमध्ये महापालिका रस्ते बांधणे व वेळोवेळी रस्ते सुस्थितीत ठेवणेकामी मोठ्या प्रमाणावर भांडवली खर्च करते. अशा रस्त्यावर ब-याचवेळी व्यावसायीक हेतुन केबल लाईन्स/ टेलीफोन लाईन्स/ इलेक्ट्रीक लाईन्स व अन्य सेवा वाहिन्या टाकणेसाठी रस्ता खोदाईस परवानगी संबंधित संस्था/ कंपनी महापालिकेकडे मागतात. सदर रस्त्यावर केबल/ लाईन्स टाकल्यावर सदर संस्था/ कंपनी यांना त्यातुन मोठ्या प्रमाणावर महसूल मिळतो. सदर संस्था/कंपनी मनपाच्या रस्त्यावर सदर व्यावसायिक व्यवहार करताना नफा कमवितात व मनपा मात्र रस्त्यावर मोठ्या प्रमाणावर भांडवली खर्च करते. सदर भांडवली खर्च काही प्रमाणात वसूल व्हावा याकरिता अशा संस्था/ कंपनी यांना रस्ता खोदाईस परवानगी देताना मनपा अधिभार लावण्यात यावा. व हा अधिभार खोदाईसह रस्ते पुर्ववत करण्याचे मनपाचे विहीत दरा खेरीज अलाहिदा असावा."असे सदरच्या प्रस्तावात नमुद आहे.

त्यानुसार, महापालिका क्षेत्रातील रस्त्यात महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी वगळून सर्व बाह्य संस्थेंकडून रस्ता पुर्ववत करण्याचे शुल्क व मनपा अधिभार आकारून रस्ता खोदाईस परवानगी देण्यात येत होती.

तथापि- १) महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी यांचेकडून तत्कालीन मा.पालकमंत्री व ऊर्जा मंत्री, महाराष्ट्र राज्य, यांचे बैठकीतील सुचनेनुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिका व पुणे महानगरपालिका यांनी र.रू.१५००/- व तदनंतर र.रू.२३००/- प्रती मी. याप्रमाणे एकत्रित शुल्क आकारून रस्ता खोदाईस परवानगी देणेचे धोरण निश्चित केले होते. महाराष्ट्र शासनाचे नगर विकास विभागाने पत्र क्र . संकीर्ण-२९१५/प्र.क्र.३७८/नवि-२० दि .१८ मार्च २०१६ अन्वये कळविले नुसार “महानगरपालिका नगरपालिका क्षेत्रात भुमिगत विज वाहीनी टाकण्यासाठी नागपुर महानगरपालिका आणि महावितरण यांचेत Road reinstatement बाबत झालेला सामंजस्य कारारनामा नमुना समजून त्यानुसार सामंजस्य करारानुसार कार्यवाही करुन अनुपालन अहवाल शासनास सादर करणेबाबत”कळविले आहे. त्यानुसार, दि.२२/१२/२०१७ च्या मा.आयुक्त यांचा मान्य प्रस्ताव, मा. महापालिका सभा ठराव क्र.१३१ दि.०५/०२/२०१८ व महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी यांचे बरोबर महापालिकेने केलेल्या दि.२८/२/२०१८ रोजीच्या सामंजस्य करारा नुसार महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी यांचेकडील भूमिगत सेवावाहिन्या टाकणेसाठी त्याच संस्थेने मनपाने विहीत केलेल्या विनिदेशा प्रमाणे रस्ते दुरूस्त करून पुर्ववत करण्याच्या अटीस अधिन राहून व फक्त र.रू.१००/- प्रति मी. या प्रमाणे पर्यवेक्षण शुल्क आकारून रस्ता खोदाईस परवानगी देण्याबाबचे धोरण निश्चित झालेले आहे.

२) महाराष्ट्र शासनाकडील दि.१७/०५/२०१३ च्या पत्रानुसार दि.१/४/२००६ च्या शासन निर्णयानुसार ज्या नेटवर्किंग अभिकर्ता/संस्था (OFC केबल टाकणा-या) शासनाची रितसर परवानगी घेऊन महापालिकेकडे परवानगी मिळणेकामी मागणी करतील अशा अभिकर्ता/संस्थांचे प्रस्तावाबाबत शासन निर्णय दि.१/४/२००६ मध्ये नमुद प्रमाणे सूट देणेबाबत चा आदेश दि.३/७/२०१३ रोजी पारीत झालेला आहे. त्यानुसार सदर आदेशाच्या दिनांका पासून ज्या नेटवर्किंग कंपन्या शासनाची परवानगी घेऊन रस्ता खोदाईसाठी अर्ज करतील अशा नेटवर्किंग कंपन्यांकडून मनपा अधिभार न घेता फक्त रस्ता पुर्ववत करण्याचे शुल्क आकारून रस्ता खोदाईस परवानगी देण्यात येत आहे. (उदा. रिलायन्स जिओ इन्फोकॉम लि., वोडाफोन सेल्युलर लि., भारती एअरटेल इत्यादी नेटवर्किंग कंपन्या).

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांनी पत्र क्र.उ.अ./IFMNS/A56045/2018 दि.१२/२/२०१८ अन्वये “सदर रस्ते म औ वि महामंडळाचे मालकीचे असून रस्ते दुरूस्ती व देखभालीसाठी पिपंरी चिंचवड महानगरपालिकेस हस्तांरीत करण्यात आलेले आहेत. तरी मऔविम, क्षेत्रामधील जून्या जलवाहिन्या बदलण्यासाठी रस्ते

खोदकाम शुल्क परिगणित करताना मनपा अधिभार लावू नये," अशी विनंती केलेली आहे.

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने महापालिकेकडे औद्योगिक क्षेत्रातील रस्ते देखभाल व दुरूस्तीसाठी हस्तांतरीत केलेले आहे. सदर रस्त्यांची जागा मालकी ही महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांची असल्याने सदर ठिकाणी त्याच संस्थेच्या भूमिगत सेवावाहिन्या टाकणेसाठी मनपा अधिभार न घेता फक्त रस्ता दुरूस्ती शुल्क घेऊन तसेच, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांना त्यांच्या जागा मालकी व्यतिरीक्त महापालिका कार्यक्षेत्रात भूमिगत सेवावहिन्या टाकणेसाठी मनपा अधिभार व रस्ता दुरूस्ती शुल्क आकारून सदर संस्थेस रस्ता खोदाईस परवानगी देणेबाबतचे धोरण निश्चित करणेसाठी मा.महापालिका सभेची मान्यता घेणे आवश्यक आहे.

तरी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने महापालिकेकडे औद्योगिक क्षेत्रातील रस्ते देखभाल व दुरूस्तीसाठी हस्तांतरीत केलेल्या जागेत त्याच संस्थेच्या भूमिगत सेवावाहिन्या टाकणेसाठी मनपा अधिभार न घेता फक्त रस्ता दुरूस्ती शुल्क आकारून, तसेच, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांना त्यांच्या जागा मालकी व्यतिरीक्त महापालिका कार्यक्षेत्रात भूमिगत सेवावहिन्या टाकणेसाठी मनपा अधिभार व रस्ता दुरूस्ती शुल्क आकारून सदर संस्थेस रस्ता खोदाईसपरवानगी देणेबाबतचे धोरणात्मक निर्णयासाठी मा. महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.

(दिनांक ३०/०५/२०१८ चे सभेत घेणेचे निर्णयाप्रमाणे)

विषय क्र.३) मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.९२/०१/२०१७-१८ मधील काम क्र.१ अन्वये, प्रभाग क्र.३१ मॅगझीन चौक उद्यान विकसित करणेकामी मे.डी.जे एंटरप्रायजेस निवीदा र.रु.३६,८६,३१४/- (अक्षरी र.रू. छत्तीस लाख, शहाऐंशी हजार तीनशे चौदा फक्त) पेक्षा २६.२७% कमी या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रू.२७,१७,९१९/- पर्यत काम करून घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरीयलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

(दिनांक ३०/०५/२०१८ चे सभेत घेणेचे निर्णयाप्रमाणे)

विषय क्र.४) मे.International Association of Lions Clubs, Lion club Of Mumbai Image संस्थेमार्फत ई-टॉयलेट बसविणेस परवानगी मिळणेबाबतचा प्रस्ताव दिनांक ३/४/२०१८ रोजी महानगरपालिकेस सादर केला आहे. सदर संस्था स्वत: सीएसआर फंडाव्दारे निधी उभारते. सदर संस्थेने महानगरपालिका हद्दीत ई-टॉयलेट उभारुन टॉयलेटच्या देखभाल दुरुस्तीसाठी त्यावर व्यावसायिक जाहिराती करणेकामी शुल्कामध्ये सवलतीसह परवानगी मागितली आहे. अशा प्रकारच्या स्वच्छतागृहांचे उभारणीसाठी महानगरपालिका परिसरात संबधित खाजगी संस्थेस जागा उपलब्ध करुन देणे, स्वच्छतेकामी लागणारे पाणी, वीज व सांडपाण्यासाठी व्यवस्था महानगरपालिकेस उपलब्ध करुन द्यावयाचे धोरण यापूर्वी महानगरपालिका सभा ठराव क्रमांक ४८ दिनांक २०/६/२०१७ अन्वये मंजूर करणेत आले आहे. सदरचे स्वच्छतागृह देखभाल दुरुस्तीसह स्वच्छतेकामी पाणी बिल, वीज बिल, कर्मचारी यांचेकरिता होणा-या खर्चासाठी संस्थेने जाहिरातीसाठी लायसेंस फी मध्ये सवलत देण्याची विनंती केली आहे. त्यानुसार परवाना विभागाचा अभिप्राय घेतला असता जागा भाडे माफ करणेस सक्षम समितीची मंजुरी मिळालेवर संबधित संस्थेने आवश्यक कागदपत्र सादर केलेवर त्यांचेकडून जाहिरात कर, परवाना फी, व प्रक्रिया शुल्क आकारणी करुन जाहिरात परवाना देणेबाबतचा अभिप्राय दिलेला आहे. जाहिरातीच्या बोर्डचा आकार १० फुट लांबी व १० फूट उंची असा राहणार असुन या आकाराचे दोन पॅनेल असणार आहे. सदरची संस्था ही पिंपरी चिंचवड महानगरपालिका परिसरात महानगरपालिकेच्या गरजेनुसार ई टॉयलेट बसविणार असुन त्यामध्ये १ शौचालय व युरीनसह पुरुष व १ शौचालय स्त्रियांसाठी असणार आहे. त्यासाठी संस्था ही १५ वर्षाचा सामंजस्य करार पुढील ५ ते १० वर्षाचे नुतनीकरण सह महानगरपालिकेसोबत करणेस तयार आहे. सदर जागेवर शौचालयाचा वापर करणेसाठी नागरिकांकडून संस्थेस कोणतेही शुल्क वसुल करता येणार नाही. जाहिरात परवाना मिळणेकरिता १) जाहिरात कर २) परवाना फी ३) प्रक्रिया शुल्क नियमानुसार संबंधित संस्थेस भरणेस बंधनकारक असणार आहे. सदरचे स्वच्छतागृहासाठी संस्थेस मनपामार्फत निशुल्क पाणीपुरवठा व जागा उपलब्ध करुन देणे ही बाब धोरणात्मक असल्याने मान्यता देणेबाबत विचार करणे.

(दिनांक ३०/०५/२०१८ चे सभेत घेणेचे निर्णयाप्रमाणे)

विषय क्र.५) मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.73-23-2017-2018 अन्वये प्रभाग क्र.१२ मधील से.क्र.२२ ओटा स्किमच्या विकसीत झालेल्या इमारतीच्या परिसरात पेव्हर ब्लॉक बसविणे व देखभालीची कामे करणेकामी राज अर्थमुव्हर्स ऍन्ड ट्रान्स्पोर्ट नि.र.रू.46,21,580/- (अक्षरी रक्कम रुपये शेहचाळीस लाख एकवीस हजार पाचशे

ऐंशी फक्त) पेक्षा 32.99% कमी या ठेकेदाराकडुन निविदा मंजूर दराने र.रू.30,96,921/- पर्यंत काम करून घेणेस या अटीस अधिन राहुन त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

(दिनांक ३०/०५/२०१८ चे सभेत घेणेचे निर्णयाप्रमाणे)

विषय क्र.६) पिंपरी चिंचवड मनपाच्या मुख्य प्रशासकिय इमारतीतील जुना जी बी हॉल येथे स्लॅब टाकणे प्रस्तावित आहे. सदर कामासाठी प्रकल्प आराखडा करणे बांधकाम परवानगी घेणे, स्ट्रक्चरल डिझाईन तयार करणे इत्यादी कामे करणे आवश्यक आहे. त्यानुसार सदरचे नियोजित स्लॅब बांधणेसाठी व त्या अनुषंगाने इतर स्थापत्य विषयक कामे करणे या कामाचे नियोजन, संकल्प चित्रे, प्रकल्प आराखडे, बांधकाम परवानगी, पुर्वगणनपत्रक, निविदा इ. तयार करणेकरीता तज्ञ वास्तुविशारद (Architect) व निविदा पश्चात कामे करणे करीता प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (PMC) ची नेमणुक करणे आवश्यक आहे. मनपा पॅनलवरील मे. के. बी.पी. सिव्हिल इंजिनिअरिंग सर्व्हिसेस यांनी मनपा मुख्य इमारतीचे स्ट्रक्चरल ऑडीट केलेले आहे. तसेच त्यांना आर्किटेक्ट, स्ट्रक्चरल व प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराचा अनुभव आहे. तसेच ते मनपाच्या प्रचलित दरानुसार विषयांकित काम करणेस तयार आहेत. तरी मे. के. बी.पी. सिव्हिल इंजिनिअरिंग सर्व्हिसेस यांचे प्रकल्प कामाचा पुर्वानुभव व कौशल्य लक्षात घेता पिंपरी चिंचवड मनपाच्या मुख्य प्रशासकिय इमारतीतील जुना जी बी हॉल येथे स्लॅब टाकणे व इतर स्थापत्य विषयक कामे करणे या प्रकल्पासाठी त्यांची वास्तुविशारद (Architect) व प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (PMC) म्हणून नेमणूक करणेचे प्रयोजन आहे.तरी पिंपरी चिंचवड मनपाच्या मुख्य इमारतीमध्ये जुना जी.बी. हॉलवर स्लॅब टाकणे व इतर स्थापत्यविषयक कामे करणे या प्रकल्पासाठी मे. के. बी.पी. सिव्हिल इंजिनिअरिंग सर्व्हिसेस यांना मनपाचे प्रचलित दराप्रमाणे वास्तुविशारद (Architect) म्हणुन निविदा रक्कम रुपये ५० लाखाच्या पुढे २% फी अदा करणेकामी व प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (PMC) म्हणुन सदर कामासाठी निविदा रकमेच्या २.७५% अशी फी अदा करणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

(दिनांक ३०/०५/२०१८ चे सभेत घेणेचे निर्णयाप्रमाणे)

विषय क्र.७) मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.१०७/१/२०१७-१८ अन्वये ब प्रभाग कार्यालयासाठी नविन प्रशासकीय इमारत बांधणेकामी M/S.AYG REALTY PVT LTD. नि.र.रू.२१,३६,१७,१६३/- (अक्षरी र.रू.एकवीस कोटी छत्तीस लाख सतरा हजार एकशे त्रेसष्ठ फक्त) पेक्षा २.९९% जास्त या ठेकेदाराकडुन निविदा मंजूर दराने र.रू.२२,००,०४,३१६/- पर्यंत काम करून घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील

निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारीत केलेल्या बेसीकदरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/ घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/ वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहुन त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र.८) मनपाच्या स्थापत्य उद्यान विभागाकडील नि.नो.क्र.२३/०१/२०१७-१८ मधील काम क्र.०१ अन्वये, पिंपरी प्र. क्र. ४४ मधील हेमू कलानी उद्यानात शहीद हेमू कलानी यांचा पुतळा उभारणेकामी मे.हर्ष एंटरप्रायजेस नि.र.रु.२४,९०,०००/- (अक्षरी र.रु. चोवीस लाख, नव्वद हजार फक्त) पेक्षा ०४.०० % जास्त या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रू.२५,८९,६००/- पर्यंत काम करून घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरीयलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करून घेणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र.९) आरोग्य विभागास पायरेथ्रम एक्स 2 टक्के आय एस आय मार्क खरेदी करणेकामी ई नि.सु.क्र.01/2018-19 अन्वये प्रसिध्द करुन ऑनलाईन निविदा दर मागविणेत आले होते. त्यानुसार ऑनलाईन तीन निविदाधारकांचे दर प्राप्त झाले आहेत. प्राप्त दरपत्रकामध्ये मे डॉल्फीन सेल्स कॉर्पोरेशन, ठाणे यांचे दर प्रती लिटर र.रु.2280/- याप्रमाणे 775 लिटरसाठी एकुण र.रु.17,67,000/- (अक्षरी र.रु. सतरा लाख सदुष्ट हजार फक्त) इतका खर्च येणार आहे. प्राप्त लघुत्तम दर स्विकृत करणेस मान्यता दिलेली असुन लघुत्तम निविदाकार यांचेबरोबर विहीत नमुन्यात करारनामा करुन पुरवठा आदेश निर्गत करणेत आलेला असल्याने त्याचे अवलोकन करणे.

विषय क्र.१०) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वाय.सी.एम. रूग्णालयामध्ये हेल्थ कार्ड मॅनेंजमेंट सिस्टिम राबविणेकामी निविदा क्रं.१४/२००८-०९ राबविण्यात आलेली होती. निविदेमधील लघुत्तम निविदाकार मे.अमृता टेक्नॉलॉजी यांना त्याच्या प्राप्त झालेल्या दरास मा.आयुक्त सो. यांची मान्यता घेवून हेल्थ कार्ड मॅनेंजमेंट सिस्टिम उभारणेत आलेली आहे. वाय सी एम एच येथील २०,००० हेल्थ कार्डचा पुरवठा दि.१९/०२/२०१८ रोजी संपलेला असल्याने वाय सी एम एच येथे रूग्णाना हेल्थ कार्ड उपलब्ध करून देणेकामी नव्याने करारनामा न करता दि.१९/०२/२०१८ पासून प्रति दिन अंदाजे ३०० कार्ड प्रमाणे कार्ड खरेदी करणेकामी अंदाजे सहा माहिने करिता म्हणजेच दि. १८ ऑगस्ट २०१८ पर्यंत १८० दिवसाकरिता १८० X ३०० कार्ड ५४,००० कार्ड घेणेकामी प्रति

कार्ड र.र.१५/- प्रमाणे अंदाजित खर्च र.रू.८,१०,०००/- इतका होणार आहे. याकामी मागील करारनाम्यास अधिन राहून आवश्यक अंदाजित खर्चास एकूण र.रू.८,१०,०००/- (अक्षरी र.रु.आठ लाख, दहा हजार फक्त) व कार्ड कमी जास्त झालेस त्याकामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र.११) पिंपरी चिंचवड मनपाचे “ग” प्रभागातील जलनि:सारण नलिकांची वार्षिक ठेकेदारी पध्दतीने साफसफाई करणे व चोकअप काढणेचे काम मे.बी.व्ही.जी इंडिया यांचे काम ५.५०% कमी दराने चालू आहे. मा.स्थायी समिती ठराव क्र.१५३२ दि. ०७/१२/२०१७ नुसार मे.बी.व्ही.जी इंडिया यांना ५.५०% कमी दराने ३ महिने करीता र.रु.२३,३७,२४५/- काम करून घेण्यास व खर्चास मान्यता दिलेली आहे. नवीन निविदेसाठी मे.विशाल सिव्हील कॉन्ट्रॅक्टर यांनी २% कमी दराने निविदा सादर केलेली आहे. बी.व्ही.जी.इंडिया व विशाल सिव्हील कॉन्ट्रॅक्टर यांच्या दराचे तुलना केली असता मे.बी.व्ही.जी.इंडिया यांचे दर कमी आहे. ३ महिना कालावधीसाठी र.रु.२४,७३,२७५/- यानुसार ५.५०% कमी दराने २३,३७,२४५/- इतका खर्च अपेक्षित आहे. त्यामुळे महानगरपालिकेचा आर्थिक फायदा होणार आहे. मा.स्थायी समिती ठराव क्र.२३८८ दि.२८/०२/२०१८ नुसार सदर कामास ६ महिन्यांची मुदतवाढ व सदर कामासाठी ‘ड’ आणि ‘अ’ प्रभागाप्रमाणे बील अदा करणेस सदस्य प्रस्तावाद्वारे मान्यता दिलेली आहे. मे.बी.व्ही.जी.इंडिया यांचेकडून ‘ग’ क्षेत्रीय जलनिःसारण विभागाकडे करीत असलेल्या कामास ३ महिने मुदतवाढ दिल्यास र.रु.२३,३७,२४५/- इतका खर्च वाढणार आहे तरी वाढीव खर्च रक्कम रु. २३,३७,२४५/- सह एकूण र.रु.४६,७४,४९०/- (अक्षरी र.रु.सेहेचाळीस लाख चौ-याहत्तर हजार चारशे नव्वद फक्त) इतक्या खर्चास मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र.१२) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेस JnNURM अंतर्गत घनकचरा व्यवस्थापन यासाठी शासनाकडील मंजूर निधीमधुन यांत्रिक पद्धतीने रस्ते सफाईकामी मनपा मालकीची VT – 650 क्षमतेची – ४ तसेच VT – 500 क्षमतेची-४ असे एकूण ८ रोडस्विपर वाहने खरेदी केली आहेत. तसेच ठेकेदार मालकीचे २ असे एकूण १० रोडस्विपर वाहनांव्दारे मनपा हद्दीतील रस्त्यांची (यांत्रिक पध्दतीने) रोडस्विपर वाहनांव्दारे दैनंदिन साफसफाई करणेकामी निविदा नोटीस क्र.२/२०१५-१६ प्रसिध्द केली असता सदर निविदेसाठी खालीलप्रमाणे लघुत्तम दर प्राप्त झाले असुन सदर ठेकेदारांना दि.१/१२/२०१५ ते दि.३०/११/२०१७ पर्यंत २ वर्ष कालावधीसाठी कामाचे आदेश दिले आहेत.

| अ.क्र. | निविदाधारक/ ठेकेदाराचे | वाहनांचा तपशिल | अंदाजपत्रकीय दर र.रु. (प्रति कि.मी प्रति दिन) | प्राप्त लघुत्तम दर र.रु.(प्रति कि.मी प्रति दिन) |
|---|---|---|---|---|
| १. | मे.डी.एम.एंटरप्रायझेस | मनपाची VT – 500-४ | ३२७/- | २१९/- |
| २. | मे.बी.व्ही.जी. इंडीया लि. | मनपाची VT – 650 -४ | ४२३/- | २७१/- |
| ३. | मे.बी.व्ही.जी. इंडीया लि. | ठेकेदाराची VT – 500 -२ | ५०३/- | २९८.५० |
| ४. | मे.डी.एम.एंटरप्रायझेस | मनपाची VT – 500- २ वाहनांकडून मुंबई - पुणे रस्ता साफसफाई | ३२७/- | २१९/- |

सदर कामाची मुदत संपली असुन मनपाचे ६ चे ८ क्षेत्रीय कार्यालय झाल्याने त्यानुसार नविन निविदेसाठीची क्षेत्रीय कार्यालयनिहाय रोडस्विपर वाहनांची आवश्यक संख्या व तसेच रुटचार्ट इत्यादी आवश्यक माहिती मागविण्यात येत आहे. सदर निविदा प्रक्रीया पुर्ण होवुन प्रत्यक्ष काम सुरु होण्यासाठी काही कालावधी जाणार आहे. तरी उपरोक्त नमुद केलेल्या दरानुसार सदर संस्थांकडून दि.१/१२/२०१७ ते ५ महिने अथवा नविन निविदा कार्यवाही पुर्ण होईपर्यंत यापैकी प्रथम होईल त्या कालावधीसाठी मा.स्थायी समिती ठराव क्र.२३५७ दिनांक २८/२/२०१८ अन्वये मान्यता दिली आहे. सदर कामाची मुदत दि.३०/४/२०१८ रोजी संपली असल्याने उपरोक्त नमुद केलेल्या दरानुसार सदर संस्थांकडून दि.१/५/२०१८ ते दि.३१/८/२०१८ अखेर ४ महिने कालावधीसाठी मुदतवाढ देण्यास (४ महिने कालावधीसाठीचा अंदाजित खर्च र.रु.१,४०,००,०००/-) (अक्षरी र.रू. एक कोटी चाळीस लाख फक्त) तसेच त्यानुसार येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र.१३) मनपाचे विविध विभागास आवश्यक फर्निचर साहित्य खरेदीकामी ई-निविदा सुचना क्र.53/2017-18 चे मंजुर दरानुसार मे.एम.पी.एल.इंजिनिअरींग, चिंचवड यांचे बाब क्र. 01, 02, 04, 06, 07, 08, 09 व 10 एकुण बाबी 08 साठी एकुण र.रु.11,26,019/-, 02. मे.सिध्दी कॉपीअर्स अँड स्टुडंट कंन्झुमर स्टोअर, पिंपरी यांचे बाब क्र.03 साठी एकुण र.रु.1,49,695/- व 03. मे.स्वरा एंटरप्रायजेस, चिंचवड यांचे बाब क्र.05 साठी एकुण र.रु.70, 800/- असे एकुण 10 बाबी साठी एकुण र.रु.13,46,514/- (अक्षरी र.रु. तेरा लाख शेहेचाळीस हजार पाचशे चौदा फक्त) इतका खर्च येणार आहे. प्राप्त लघुत्तम दर स्विकृत करणेस मान्यता दिलेली असुन लघुत्तम निविदाकार यांचेबरोबर विहीत नमुन्यात करारनामा करुन पुरवठा आदेश निर्गत करणेत आलेला असलेने

त्याचे अवलोकन करणे.

विषय क्र.१४) मनपाच्या स्थापत्य विभागाकडील प्रस्तावा सोबतच्या प्रपत्र अ (१ ते १७ ) मधील निविदा कामांचे अवलोकन होवुन नियमानुसार व निविदा अटीशर्ती प्रमाणे तसेच भागवाढ कलम लागू असल्यास, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/ वसुल करणे बंधनकारक राहिल या अटीस अधिन राहून संबंधित ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करुन कामाचे आदेश निर्गत केले असल्याने त्याचे अवलोकन करणे.

विषय क्र.१५) १ जुन २०१८ ते ३१ मे २०२१ (३ वर्ष) ह्या कालावधिकरीता वाय.सी.एम.हॉस्पिटल येथील UPS Sysyem (4 UPS) ची वार्षीक देखभाल दुरूस्ती करणे चे कामकाज मे. पॉवर व्हिजन इन्फो सर्व्हिसेस प्रा.लि. ह्या उत्पादक कंपनीकडून थेट पद्धतीने करारनामा करून करवून घेणेस व त्या कामी प्रतिवर्षि (र.रू. ३,९९,२००/- + टॅक्सेस = ४,७१,०५६/-) (अक्षरी र.रू. चार लाख एक्काहत्तर हजार छपन्न फक्त) त्यांस आगावू अदा करणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र.१६) पिंपरी चिंचवड मनपाच्या मालकीची जुनी/निकामी एकूण ६९ वाहनाचा लिलाव करणेकरीता लिलावदाराची नेमणूक करण्यासाठी ३ वेळा केलेल्या ई–निविदा कार्यवाहीत अंतिमत: एक निविदा प्राप्त झालेने सदर निविदा दि.१३/०३/२०१८ रोजी सक्षम मान्यतेने उघडण्यात आली असता त्यामध्ये मे.रिलायन्स ऑक्शनर्स यांचे आर.टी.ओ.ने विहीत केलेल्या वाहनांच्या लिलावाच्या गोपनिय किंमतीनुसार प्रत्यक्ष लिलावात ठरणा-या वाहनांच्या विक्रीच्या किंमतीवर २% इतका लिलाव कमिशन दर प्राप्त झाला आहे. सदर दर स्विकृतीस व त्यानुसार एक वर्ष कालावधी करीता करारनामा करणेस तसेच त्या दराने लिलावदाराचे येणारे कमिशन अदा करणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र.१७) मनपाचे विद्युत विभागासाठी आवश्यक विविध एसी,वॉटर कुलर्स आणि फॅन्स साहित्य खरेदीकामी ई निविदा सुचना क्र.38/1/2017-18 अन्वये, ऑनलाईन निविदा दर मागविणेत आले होते. यानुसार सदर निविदे करीता एकुण सहा निविदाकार प्राप्त झाले. निविदेतील प्राप्त लघुत्तम निविदाकार मे.एनर्जी टेक सिस्टीम यांचे प्राप्त लघुत्तम बाब क्र.1 याप्रमाणे एकुण 01 बाबी साहित्याचे लघुत्तम दर एकुण र.रू.14,70,000/- हे अंदाजपत्रकीय दरापेक्षा 8.02% ने कमी असल्याने व मे.धूपर ब्रदर्स ट्रेडींग प्रा.लि.

यांचे प्राप्त लघुत्तम दर बाब क्र. 2 व 3 याप्रमाणे एकुण 02 बाबी साहित्याचे लघुत्तम दर एकुण र.रू.10,13,750/- हे अंदाजपत्रकीय दरापेक्षा 15.73% ने कमी असल्याने तसेच मे.यश इलेक्ट्रोलाईन यांचे प्राप्त लघुत्तम दर बाब क्र.4 व 5 याप्रमाणे एकुण 02 बाबी साहित्याचे लघुत्तम दर एकुण र.रू.1,03,875/- हे अंदाजपत्रकीय दरापेक्षा 0.26% ने कमी असल्याने याप्रमाणे सदर एकुण लघुत्तम दर बाब क्र.1,2,3,4,5 या सर्व साहित्यांचे प्राप्त लघुत्तम दर एकुण र.रू.25,87,625/- (अक्षरी र.रु.पंचवीस लाख, सत्याऐंशी हजार, सहाशे पंचवीस फक्त) हे अंदाजपत्रकीय दरापेक्षा 10.94% ने कमी असल्याने स्विकृत करून त्यांचेबरोबर करारनामा करुन पुरवठा आदेश निर्गत करणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र.१८) महाराष्ट्र महापालिका अधिनियम मधील कलम १०५(१) अन्वये लेखापरिक्षण विभागाकडील माहे एप्रिल २०१८ अखेर संपणारा मासिक गोषवारा मा.मुख्यलेखा परिक्षक यांनी क्र.मुलेप/६/कावि/९७/२०१८ दि.२१.०५.२०१८ अन्वये पाठविलेल्या अहवालाचे अवलोकन करणे.

विषय क्र.१९) दि.२६ जानेवारी २०१८ रोजी देशातील सर्वात उंच राष्ट्रध्वजाचे भक्ती - शक्ती चौक निगडी येथे प्रजासत्ताकदिनी उदघाटन, ध्वजारोहन कार्यक्रमासंदर्भात १४४० विदयार्थ्यांना खाऊ म्हणून बिस्कीटांचा थेट पध्दीतीने खरेदी करणेकामी मे.श्री.भक्ती एंटरप्रायजेस, चिखली प्राधिकरण पुणे–१९ यांचेकडून एकुण १४४० विद्यार्थ्यांना ब्रिटानिया ६६ ग्रॅम वजनाचे गुड डे रिच बटर कुकीज बिस्कीटांचा ०१ पुडा प्रति नग ९.०९ दर याप्रमाणे १४४० पुडयांचे एकुण र.रू.१३,१०१/- व मे.साई सेवा केटरर्स, चिंचवड, पुणे – १९ यांचेकडून १४०० विदयार्थ्यांना पाणी बाटली थेट पध्दतीने खरेदी करणेकामी प्रति पाणी बाटली १०/- दर याप्रमाणे १४०० बाटल्यांचे र.रु.१४,०००/- असे एकूण र.रु.२७,१०१/-(अक्षरी र.रू. सत्तावीस हजार एकशे एक फक्त) अदा करणेत आलेल्या खर्चास मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र.२०) पिंपरी चिचंवड मनपाच्या माध्यमिक विद्यालयासांठी सन 2018-19 या शैक्षणिक वर्षात इयत्ता 5 ते 8 वी व 9 ते 10 वी च्या मराठी, इग्रंजी, ऊर्दु माध्यमासाठीएकुण ३९९४८ क्रमिक पुस्तके थेट पध्दतीने खरेदीकामी महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती अभ्यासक्रम संशोधन मंडळ, बालभारती, पुणे यांना आगाऊ रक्कम रू.21,80,436/- किंवा येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र.२१) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या माध्यमिक शिक्षण विभागांतर्गत असलेल्या १८ माध्यमिक विद्यालयातील तसेच औद्योगिक प्रशिक्षण केंद्र (मुलांचे), मोरवाडी, औद्योगिक प्रशिक्षण केंद्र मुलींच्या, कासारवाडी मधील विद्यार्थ्यांना २६ जानेवारी २०१८ प्रजासत्ताक दिना निमित्त विद्यार्थ्यांना खाऊ म्हणून ब्रिटानिया गुड डे रिच बटर ६६ ग्रॅम बिस्कीटे पुरवठा करणेकामी नामांकीत कपंनी ब्रिटानिया इंडस्ट्रीज लि मि. बेंगलोर या उत्पादीत कंपनीचे पिंपरी चिंचवड मधील अधिकृत विक्रेते मे.भक्ती एंटरप्रायजेस, शिवतेजनगर, चिंचवड स्टेशन, पुणे–१९ यांचे कडून करारनामा न करता, सरळ थेट पध्दतीने खरेदी केले असल्याने प्रति नग ९.०९ दर या प्रमाणे एकुण ९,१०८ विद्यार्थ्यांचे एकूण र.रू.८२,७९२/- (अक्षरी र.रू.ब्याऐंशी हजार सातशे ब्याण्णव फक्त) खर्चास मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र.२२) मुंबई प्रांतिक महापालिका अधिनियम १९४९ चे कलम ९४ नुसार महानगरपालिकेचे सन २०१६-१७ या वर्षातील प्रत्यक्ष जमा खर्चाचे वार्षिक लेखे तयार करण्यात आले आहेत. सदर वार्षिक लेख्यांनुसार प्रत्यक्ष जमा खर्चास मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र.२३) मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती सभा ठराव क्रमांक ०४ दिनांक २५/०५/२०१८ अन्वये आगामी जिल्हास्तर शालेय हॉकी स्पर्धा २०१८-१९ अनुषंगाने २५० विद्यार्थी खेळाडूंचे मेजर ध्यानचंद हॉकी स्टेडीयम नेहरूनगर, पिंपरी १८ येथे दि.१५/०४/२०१८ ते १४/०५/२०१८ या काळात उन्हाळी हॉकी प्रशिक्षण शिबीर २०१७ आयोजित करणेस व त्याकामी येणा-या र.रु.६,५४,०००/- (अक्षरी र.रु.सहा लाख चौप्पन्न हजार फक्त) अथवा प्रत्यक्ष येणा-या खर्चास मान्यता व सदरचा खर्च, क्रीडा निधी, क्रीडा प्रशिक्षण शिबीर या लेखाशिर्षावर खर्ची टाकणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र.२४) मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती सभा ठराव क्रमांक ०५ दिनांक २५/०५/२०१८ अन्वये म.न.पा.च्या वतीने २ उन्हाळी प्रशिक्षण शिबीर २०१८ आयोजित करणेस व सदर २ उन्हाळी प्रशिक्षण शिबीर २०१८ सहभागी होणा-या १८० विद्यार्थी व प्रशिक्षण यांना क्रीडा प्रबोधिनीचे विद्यार्थ्यांना पुरविण्यात येणारे माध्यमिक शिक्षण विभागाचे दराने अल्पोपहार देणेकामी एकूण र.रु.१,२२,४६५/- व ४५० प्रमाणपत्र अंदाजे र.रु.१५/-प्रमाणे र.रु.६,७५०/- एकूण र.रु.१,२९,२१५/- (अक्षरी र.रु.एक लाख एकोणतीस हजार दोनशे पंधरा फक्त) चे खर्चास अथवा प्रत्यक्ष येणा-या खर्चास मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र.२५) मनपाच्या विद्युत मुख्य कार्यालयाकडील निविदा नो.क्र.36-2017/18 मधील अ.क्र.1 अन्वये प्रभाग क्र.27 मध्ये एल.ई.डी. दिवे बसविणेकामी मे.मनुश्री इलेक्ट्रीकल्स नि.र.रू.29,95,180/- (अक्षरी र.रू.एकोणतीस लाख पंच्च्याण्णव हजार एकशे ऐंशी फक्त) पेक्षा 16.60% कमी, या दराने ठेकेदाराकडुन काम करुन घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटीस अधिन राहुन ठेकेदाराबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र.२६) मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.102/1/2017-18 अन्वये क्रांतीवीर चापेकर वाड्याच्या तिस-या टप्प्याची कामे करणे भाग १ कामी मे.यशक असोसिएट्स नि.र.रू.48,96,009/- (अक्षरी रक्कम अठ्ठेचाळीस लाख शह्यानौ हजार नऊ फक्त) पेक्षा 11.88% पेक्षा कमी या दराने र.रू.43,14,363/- पर्यंत काम करून घेणेस आणि त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र.२७) मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.103/7/2017-18 अन्वये प्रभाग क्र.१८ मध्ये ताब्यात येणारे आरक्षणे विकसीत करणेकामी मे.एस.व्ही. सातपुते डेव्हलपर्स अन्ड बिल्डर्स नि.र.रू.27,93,670/- (अक्षरी रक्कम सत्ताविस लाख त्र्यान्नव हजार सहाशे सत्तर फक्त) पेक्षा 27.27% कमी या दराने र.रू.20,31,836/- पर्यंत काम करून घेणेस आणि त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८ नगरसचिव कार्यालय,
क्रमांक - नस/३/कावि/७२१/२०१८
दिनांक - २५/०५/२०१८

टिप - प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची विषयपत्रे (डॉकेटस) नगरसचिव कार्यालयात वाचणेसाठी ठेवणेत आलेली आहेत.

(क्र.स्था/नि/फ-मुख्य/कावि/२७५/२०१८, दि.१९/०५/२०१८ विषय क्र.१४ चे लगत)

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी-१८ स्थापत्य फ मुख्यालय
क्र.स्था/नि/फ-मुख्य/२७५/२०१८
दि.१९/५/२०१८

प्रपत्र अ ( १ ते १७ )

| अ. क्र. | ठेकेदाराचे नाव | निविदा क्रमांक | कामाचे नाव | करारनामा केलेली तारिख | कामाचा आदेश क्रमांक | कामाचा आदेशाची तारीख | निविदा रक्कम | स्विकृत दर | | निविदा खर्चाची मान्यतेची रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | | १० |
| १ | बी.एम.पवार | ७३/४४/२०१७-१८ | सन २०१७-१८ साठी प्रभाग क्र.६१ येथील क्रिडा विषयक किरकोळ दुरुस्तीची व देखभालची कामे करणे. | ०७/०३/१८ | स्था/नि/फ-मुख्य/२५६/२०१८ | १८/०४/१८ | १८,००,००० | ३०.०६ | %कमी | १२५८९२० |
| २ | बी.एम.पवार | ७३/१७/२०१७-१८ | प्रभाग क्र. ६१ दापोडी बॉम्बे कॉलनी परिसरात नाला बांधणे | ०७/०३/१८ | स्था/नि/फ-मुख्य/२५५/२०१८ | १८/०४/१८ | १५,००,००० | ३०.०६ | %कमी | १०४९१०० |
| ३ | श्री साई कन्स्ट्रक्शन | ७३/२२/२०१७-१८ | प्रभाग क्र.५९ सांगवी मधील सातपुडा सोसायटीमध्ये स्थापत्य विषयक कामे करणे. | ०९/०५/१८ | स्था/नि/फ-मुख्य/२६४/२०१८ | १५/०५/१८ | ११,१५,४७२ | १०.०० | %कमी | १००३९२५ |
| ४ | अतुल व्ही मिसाळ | ७३/५७/२०१७-१८ | प्रभाग क्र.५९ सांगवी मधील गंगानगर भागामध्ये स्थापत्य विषयक कामे करणे. | ०४/०५/१८ | स्था/नि/फ-मुख्य/२६६/२०१८ | १५/०५/१८ | ११,१५,५९९ | ११.०० | %कमी | ९९२८८३ |
| ५ | अतुल व्ही मिसाळ | ७३/३९/२०१७-१८ | प्रभाग क्र.६० सांगवी जयमालानगर भागामध्ये स्थापत्य विषयक कामे करणे. | ०४/०५/१८ | स्था/नि/फ-मुख्य/२६५/२०१८ | १५/०५/१८ | ११,१३,८२२ | ११.०० | %कमी | ९९१३०२ |
| ६ | अतुल व्ही मिसाळ | ७३/३०/२०१७-१८ | प्रभाग क्र.५९ सांगवी मधील आनंदनगर भागामध्ये स्थापत्य विषयक कामे करणे. | ०४/०५/१८ | स्था/नि/फ-मुख्य/२६३/२०१८ | १५/०५/१८ | ११,१४,८९८ | ११.०० | %कमी | ९९२२५९ |
| ७ | बहीरट ब्रदर्स | ७३/३५/२०१७-१८ | प्रभाग क्र.६० सांगवी परिसर विविध सेवा वाहिन्यांचे चर बुजविणे. | ०६/०३/१८ | स्था/नि/फ-मुख्य/२५७/२०१८ | ०७/०५/१८ | ११,१७,६३६ | ९.१० | %कमी | १०१५९३१ |
| ८ | जी आर मंगोडेकर | ७३/५९/२०१७-१८ | प्रभाग क्र.३७ महात्मा फुलेनगर मधील एम आय डी सी जनरल ब्लॉक मध्ये आवश्यक ठिकाणी फुटपाथ कर्बीग करणे. (सन २०१७-१८) | ०६/०३/१८ | स्था/नि/फ-मुख्य/२४९/२०१८ | १९/०३/१८ | १४,९९,४९६ | २७.१० | %कमी | १०९३१३३ |

| अ. क्र. | ठेकेदाराचे नाव | निविदा क्रमांक | कामाचे नाव | करारनामा केलेली तारिख | कामाचा आदेश क्रमांक | कामाचा आदेशाची तारीख | निविदा रक्कम | स्विकृत दर | | निविदा खर्चाची मान्यतेची रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ९ | सोपान जनार्दन घोडके | ७३/४/२०१७-१८ | प्रभाग क्र.५९ सांगवी मधील शितोळेनगर भागामध्ये पेव्हींग ब्लॉक बसविणे. | १६/०३/१८ | स्था/नि/फ-मुख्य/२४७/२०१८ | १६/०३/१८ | ११,१२,३८७ | १२.०० | %कमी | ९७८९०१ |
| १० | पेव्हवे कन्स्ट्र प्रा लि | ७३/२८/२०१७-१८ | प्रभाग क्र.५८ स्वामी विवेकानंदनगर भागातील अंतर्गत रस्त्यांचे डांबरीकरण करणे. | १६/०३/१८ | स्था/नि/फ-मुख्य/२६८/२०१८ | १५/०५/१८ | ११,२०,४०६ | १६.५० | %कमी | ९३५५३९ |
| ११ | देव कन्स्ट्रक्शन | ८/३९/२०१७-१८ | प्रभाग क्र.३० चक्रपाणी वसाहत मध्ये सेवा वाहिन्यांसाठी खोदलेल्या रस्त्यांची दुरुस्ती करणे | ०६/०३/१८ | स्था/नि/इमु/१३७/२०१८ | २३/०४/१८ | १४,९९,९६६ | ३.७५ | %कमी | १४४३७१७ |
| १२ | श्री साईकृपा कन्स्ट्र | ७३/६३/२०१७-१८ | प्रभाग क्र.५८ नवी सांगवी परिसरामध्ये स्थापत्य विषयक कामे करणे. | ०४/०५/१८ | स्था/नि/फ-मुख्य/२७४/२०१८ | १५/०५/१८ | ११,१८,८५५ | १०.०१ | %कमी | १००६८५८ |
| १३ | प्रसाद बबन देवकर | ७३/४७/२०१७-१८ | प्रभाग क्र.५८ किर्तीनगर भागामध्ये स्थापत्य विषयक कामे करणे. | ०४/०५/१८ | स्था/नि/फ-मुख्य/२७३/२०१८ | १५/०५/१८ | ११,१३,६८० | १०.१० | %कमी | १००११९८ |
| १४ | श्री साईकृपा कन्स्ट्र | ७३/४३/२०१७-१८ | प्रभाग क्र.५८ स्वामी विवेकानंदनगर भागामध्ये स्थापत्य विषयक कामे करणे. | ०४/०५/१८ | स्था/नि/फ-मुख्य/२७२/२०१८ | १५/०५/१८ | ११,१४,४८५ | १०.२० | %कमी | १०००८०८ |
| १५ | श्री साईकृपा कन्स्ट्र | ७३/४८/२०१७-१८ | प्रभाग क्र.५८ संत तुकारामनगर भागामध्ये स्थापत्य विषयक कामे करणे. | ०४/०५/१८ | स्था/नि/फ-मुख्य/२७१/२०१८ | १५/०५/१८ | ११,१२,८२२ | १०.०१ | %कमी | १००१४२९ |
| १६ | प्रसाद बबन देवकर | ७३/१०/२०१७-१८ | प्रभाग क्र.६० सांगवी पवारनगर, मुळानगर भागामध्ये स्थापत्य विषयक कामे करणे. | ०४/०५/१८ | स्था/नि/फ-मुख्य/२७०/२०१८ | १५/०५/१८ | ११,१६,६३६ | १२.९९ | %कमी | ९७१५८५ |
| १७ | ए आर नायडू | ७३/१५/२०१७-१८ | प्रभाग क्र.५९ सांगवी मधील शितोळेनगर भागामध्ये स्थापत्य विषयक कामे करणे. | ०४/०५/१८ | स्था/नि/फ-मुख्य/२६९/२०१८ | १५/०५/१८ | ११,१५,४९३ | १०.१० | %कमी | १००२८२८ |
| | | | एकुण | | | | २,०८,०१,६५३/- | | | १,७४,४०,३९६/- |

कार्यकारी अभियंता
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११०१८